RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ८६(३)] बुधवार, जून २१, २०२३/ज्येष्ठ ३१, शके १९४५ [पृष्ठे १३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २४१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जून, २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक एआरपी-२०२३/प्र.क्र.४८/तांशि-४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) तसेच कलम २ चा खंड (द) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेली, शासकीय अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,क्रमांक टीईएम-२०२०/प्र.क्र.७१/तांशि-४,दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) अन्वये, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी व्यावसायिक पाठ्यक्रम असल्याचे यात विनिर्दिष्ट केलेले व्यावसायिक शिक्षण पदवीपूर्व पाठ्यक्रम व व्यावसायिक शिक्षण पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम आणि त्यांच्या प्रवेशांच्या पात्रतेच्या शर्ती व आवश्यकता अधिसूचित केलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने, तिच्या मान्यता प्रक्रियेच्या हस्तपुस्तिका, २०२३-२४ द्वारे विवक्षित पदवीपूर्व व पदव्युत्तर तांत्रिक शिक्षण पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या पात्रतेमध्ये केलेले फेरबदल विचारात घेता, अशा पाठ्यक्रमांकरिता, उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या पात्रतेच्या शर्तींमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे:

आणि ज्याअर्थी, वास्तुशास्त्र परिषदेने, वास्तुशास्त्र परिषद (वास्तुशास्त्र शिक्षणाची किमान मानके) विनियम, २०२० द्वारे पदवीपूर्व वास्तुशास्त्र शिक्षण पाठ्यक्रमाच्या किमान मानकांनुसार पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याच्या दृष्टीने, अशा पाठ्यक्रमांकरिता उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या पात्रता शर्तींमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने राज्यातील काही औषधनिर्माणशास्त्र संस्थांना शैक्षणिक वर्ष, २०२३-२४ पासून, औषधनिर्माणशास्त्र पदवी (व्यवसाय) पाठ्यक्रम सुरू करण्यासाठी मान्यता दिली आहे, आणि उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (द) अन्वये औषधनिर्माणशास्त्र पदवी (व्यवसाय) पाठ्यक्रम हा व्यावसायिक पाठ्यक्रम असल्याचे अधिसूचित करणे आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी (व्यवसाय) विनियम, २०१४ नुसार उक्त पाठ्यक्रमाच्या प्रवेशांकरिता पात्रता शर्ती व आवश्यकता विनिर्दिष्ट करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) तसेच कलम २ चा खंड (द) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, उपरोक्त प्रयोजनांसाठी, उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेत,—

(१) उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची क मधील,–

(क) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान यांमधील पदवीपूर्व पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक १ येथील नोंदीमधील, स्तंभ (३) मध्ये,–

(एक) प्रथम वर्ष प्रवेशाशी-संबंधित असलेल्या नोंद (क) मधील,–

(I) खंड (१) मध्ये, उप-खंड (दोन) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईल :—

"किंवा

(दोन) त्याने त्याच किंवा संलग्न क्षेत्रातील तीन वर्षांची व्यवसाय पदविका (डी.व्होक) शाखेतील परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी;";

(II) खंड (२) मध्ये, उप-खंड (दोन) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईल :–

"किंवा

(दोन) त्याने त्याच किंवा संलग्न क्षेत्रातील तीन वर्षांची व्यवसाय पदविका (डी.व्होक) शाखेतील परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी;";

(दोन) थेट द्वितीय वर्ष अनुषंगिक प्रवेशाशी संबंधित असलेल्या नोंद (ख) मध्ये, खंड (दोन) मधील, "डी. व्होक पदविका परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी" या मजकुराऐवजी "तीन वर्षांची त्याच किंवा संबंधित क्षेत्रातील व्यवसाय पदविका (डी.व्होक) परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पदवीपूर्व वास्तुशास्त्र पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ३ येथील नोंदीमधील, स्तंभ (३) मधील,–
(एक) खंड (१) मध्ये, उप-खंड (दोन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :–

"(दोन) उमेदवाराने, १०+२ परीक्षा पध्दतीच्या अंतिम परीक्षेत, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित विषयांमध्ये एकूण किमान ५० टक्के गुणांसह (केवळ महाराष्ट्र राज्यातील अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४५ टक्के गुण) मिळविलेले असावेत आणि १०+२ स्तरावरील परीक्षेत देखील एकूण किमान ५० टक्के गुण ( केवळ महाराष्ट्र राज्यातील आहेत अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळविलेले असावेत;

किंवा

(दोन) उमेदवाराने, गणित या अनिवार्य विषयासह, एकूण किमान ५० टक्के (केवळ महाराष्ट्र राज्यातील आहेत अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४५ टक्के गुण) गुणांसह १०+३ पदविका परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी;";

(दोन) खंड (२) मध्ये, उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल:–

“(एक) उमेदवाराने, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित विषयांमध्ये १०+२ परीक्षा पद्धतीच्या अंतिम परीक्षेत एकूण किमान ५० टक्के गुण मिळविलेले असावेत आणि १०+२ स्तरावरील परीक्षेत देखील एकूण किमान ५० टक्के गुण मिळवलेले असावेत;

किंवा

(एक) उमेदवाराने, गणित या अनिवार्य विषयासह (१०+३ ) पदविका परीक्षा किमान ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण केलेली असावी ; ”.

(ग) पदवीपूर्व नियोजन (प्लॅनिंग) पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ४ येथील नोंदीमधील, स्तंभ (३) मध्ये, -

(एक) खंड (१) मधील,–

(I) उप-खंड (दोन) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :–

“ (दोन) उमेदवार, भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र किंवा संगणक विज्ञान किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती तंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा माहिती व्यवसाय (इन्फॉरमॅटिक्स प्रॅक्टिसेस) किंवा जैवतंत्रज्ञान किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कृषि किंवा अभियांत्रिकी आलेखिकी (ग्राफिक्स) किंवा व्यवसाय अभ्यास किंवा उद्योजकता यांपैकी कोणत्याही दोन विषयांसह गणित हा अनिवार्य विषय घेऊन १०+२ परीक्षा उत्तीर्ण असावा आणि त्याने एकूण किमान ४५ टक्के गुण (केवळ महाराष्ट्र राज्यातील असतील अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, एकूण किमान ४० टक्के गुण) मिळविलेले असावेत आणि उमेदवाराने, सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या एमएएच-बी.प्लॅनिंग-सीईटीत नॉनझिरो प्राप्तांक मिळविलेला असला पाहिजे;

किंवा

(दोन) उमेदवार, भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र किंवा संगणक विज्ञान किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती तंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा माहिती व्यवसाय (इन्फॉरमॅटिक्स प्रॅक्टिसेस) किंवा जैवतंत्रज्ञान किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कृषि किंवा अभियांत्रिकी आलेखिकी (ग्राफिक्स) किंवा व्यवसाय अभ्यास किंवा उद्योजकता यांपैकी कोणत्याही दोन विषयांसह गणित हा अनिवार्य विषय घेऊन १०+२ परीक्षा उत्तीर्ण असावा आणि त्याने एकूण किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील असतील अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, एकूण किमान ४० टक्के गुण ) मिळविलेले असावेत. हे उमेदवार केवळ संस्था स्तरीय प्रवेशाकरिता पात्र असतील :

परंतु, सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सीईटीच्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल;

किंवा

(दोन) त्याने त्याच किंवा संबंधित क्षेत्रातील व्यवसाय पदविका (डी.व्होक) शाखेतील परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.”;

(II) उप-खंड (तीन) वगळण्यात येईल;

(दोन) खंड (२) मधील,-

(I) उप-खंड (दोन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल:-

“ (दोन) त्याने भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र किंवा संगणक विज्ञान किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती तंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा माहिती व्यवसाय (इन्फॉरमॅटिक्स प्रॅक्टिसेस) किंवा जैवतंत्रज्ञान किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कृषि किंवा अभियांत्रिकी आलेखिकी (ग्राफिक्स) किंवा व्यवसाय अभ्यास किंवा उद्योजकता यांपैकी कोणत्याही दोन विषयांसह गणित हा अनिवार्य विषय घेऊन १०+२ परीक्षा उत्तीर्ण असावा आणि त्याने एकूण किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील असतील अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग

व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, एकूण किमान ४० टक्के गुण ) मिळविलेले असावेत आणि उमेदवाराने, जेईई (मुख्य) बी-प्लॅनिंग (नियोजन) मध्ये नॉनझिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळविलेला असला पाहिजे किंवा सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सीईटीत नॉनझिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळविलेला असला पाहिजे :

परंतु, जेईई (मुख्य) बी- प्लॅनिंग (नियोजन) मधील नॉनझिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांस, सीईटीत नॉनझिरो प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल ;

किंवा

(दोन) उमेदवार, भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र किंवा संगणक विज्ञान किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती तंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा माहिती व्यवसाय (इन्फॉरमॅटिक्स प्रॅक्टिसेस) किंवा जैवतंत्रज्ञान किंवा तांत्रिक व्यावसायिक विषय किंवा कृषि किंवा अभियांत्रिकी आलेखिकी (ग्राफिक्स) किंवा व्यवसाय अभ्यास किंवा उद्योजकता यांपैकी कोणत्याही दोन विषयांसह गणित हा अनिवार्य विषय घेऊन १०+२ परीक्षा उत्तीर्ण असावा आणि त्याने एकूण किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील असतील अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, एकूण किमान ४० टक्के गुण ) मिळविलेले असावेत. हे उमेदवार, केवळ संस्था स्तरीय प्रवेशाकरिता पात्र असतील :

परंतु, जेईई (मुख्य) बी-प्लॅनिंग (नियोजन) किंवा सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सीईटीच्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल;"

किंवा

(दोन) त्याने त्याच किंवा संबंधित क्षेत्रातील व्यवसाय पदविका (डी. व्होक) शाखेतील परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी;";

(II) उप-खंड (तीन) वगळण्यात येईल.

(घ) पदवीपूर्व हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ५ येथील नोंदीमधील, स्तंभ (३) मध्ये,–

(एक) प्रथम वर्ष प्रवेशाशी-संबंधित असणाऱ्या (क) च्या नोंदीमधील–

(I) खंड (१) मध्ये,

(क) उप-खंड (दोन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :–

"(दोन) त्याने, एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे आणि त्यात, त्याने एकूण किमान ४५ टक्के गुण (केवळ महाराष्ट्र राज्यातील असतील अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळविलेले असावेत आणि सामाईक प्रवेश परीक्षेमध्ये (सीईटी) नॉनझिरो प्राप्तांक मिळविलेला असला पाहिजे.

किंवा

(दोन) त्याने त्याच किंवा संबंधित क्षेत्रातील व्यवसाय पदविका (डी.व्होक) शाखेतील परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी;"

(ख) उप-खंड (तीन) वगळण्यात येईल;

(II) खंड (२) मध्ये,

(क) उप-खंड (दोन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :–

"(दोन) त्याने, एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे आणि त्यात त्याने, एकूण किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील असतील अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या

व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४० टक्के गुण) मिळविलेले असावेत आणि हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान राष्ट्रीय परिषदेच्या राष्ट्रीय परीक्षा एजेंसीने घेतलेल्या एनसीएचएम जेईईमध्ये नॉनझिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळविलेला असावा किंवा सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेत (सीईटी) नॉनझिरो प्राप्तांक मिळविलेला असावाः

परंतु, एनसीएचएम जेईई मधील नॉनझिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांस, सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सीईटीत नॉनझिरो प्राप्तांक मिळवलेल्या उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल;

किंवा

(दोन) त्याने त्याच किंवा संबंधित क्षेत्रातील व्यवसाय पदविका (डी.व्होक) शाखेतील परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी." ;

(ख) उप-खंड (तीन) वगळण्यात येईल.

(ङ) अभिकल्प पदवीपूर्व पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ८ येथील नोंदीमधील, स्तंभ (३) मध्ये,—

(एक) प्रथम वर्ष प्रवेशाशी संबंधित असणाऱ्या नोंद (क) मधील, खंड (१) मधील, उप-खंड (दोन) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :-

"(दोन) उमेदवार, १०+२ परीक्षा उत्तीर्ण असावा आणि त्यात त्याने एकूण किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, एकूण ४० टक्के गुण) मिळविलेले असावेत आणि सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेमध्ये नॉनझिरो प्राप्तांक मिळविलेला असला पाहिजे;

किंवा

(दोन) त्याच किंवा संबंधित क्षेत्रामधील व्यवसाय पदविका (डी.व्होक) शाखेतील परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.";

(च) अनुक्रमांक ८ येथील नोंदीनंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :-

"९. औषधनिर्माण शास्त्रातील पदवीपूर्व पाठ्यक्रम [औषधनिर्माण शास्त्रातील पदवी बी.फार्म (व्यवसाय)] महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार आणि अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार,-

(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;

(दोन) औषधनिर्माणशास्त्र अधिनियम, १९४८ (१९४८ चा ८) याच्या कलम १२ अन्वये भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने (फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया) मान्यता दिलेल्या संस्थेमधून औषधनिर्माण शास्त्रातील पदविका पाठ्यक्रम उत्तीर्ण असला पाहिजे;

(तीन) नोंदणीकृत औषधनिर्माता (फार्मसिस्ट)असला पाहिजे;

(चार) समाजसेवी किंवा रुग्णालयीन औषधनिर्माण शास्त्रामधील औषधनिर्माण व्यवसायातील किमान चार वर्षांचा अनुभव असला पाहिजे;

(पाच) नियोक्त्याकडून "ना हरकत प्रमाणपत्र" मिळविलेले असले पाहिजे;

(सहा) अधिनियमान्वये निश्चित केल्याप्रमाणे, समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेले अन्य कोणतेही निकष.".

२. उक्त अधिसूचनेला जोडलेल्या अनुसूची ख मध्ये,—

(क) पदव्युत्तर पदवी संगणक उपयोजन पाठ्यक्रमाशी [संगणक उपयोजन अधिस्नातक (एमसीए)] संबंधित,

असणाऱ्या अनुक्रमांक २ येथील नोंदीऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

"२. पदव्युत्तर पदवी संगणक उपयोजन पाठ्यक्रम

(संगणक उपयोजन अधिस्नातक) (एमसीए) (क) प्रथम वर्ष प्रवेश,-

(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार, अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार, जम्मू व काश्मीर केंद्रशासित प्रदेशामधील व लडाख केंद्र शासित प्रदेशामधील स्थलांतरित उमेदवारी असलेले उमेदवार.:-

(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;

(दोन) उमेदवाराने कोणतीही पात्रता पदवी परिक्षा (उदाःबी.ई.(अभियांत्रिकी पदवी) / बी.टेक.(तंत्रज्ञान पदवी)/ बी.एस.सी.(विज्ञान पदवी)/ बी.कॉम. (वाणिज्य पदवी)/बी.ए.(कला पदवी)/बी.व्होक (व्यवसाय पदवी)/ बी.सी.ए. (संगणक उपयोजन पदवी), इत्यादी.) किमान ५० टक्के गुणांसह (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशा राखीव प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) उत्तीर्ण केलेली असावी. तसेच, शक्यतो १०+२ स्तरावरील परीक्षेत किंवा पदवी स्तरावरील परिक्षेत गणित विषय दिलेला असावा.

(तीन) उमेदवाराने, सीईटीमध्ये नॉनझिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळविलेला असला पाहिजे.

(२) अनिवासी भारतीय/भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती/भारतीय वंशाच्या व्यक्तीची आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक उमेदवारी असलेले उमेदवार,-

(एक) उमेदवाराने कोणतीही पात्रता पदवी परिक्षा (उदाः बी.ई. (अभियांत्रिकी पदवी)/ बी.टेक. (तंत्रज्ञान पदवी) / बी.एस.सी.(विज्ञान पदवी)/ बी.कॉम. (वाणिज्य पदवी)/बी.ए.(कला पदवी)/ बी.व्होक (व्यवसाय पदवी)/ बी.सी.ए. (संगणक उपयोजन पदवी), इत्यादी.) किमान ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण केलेली असावी. तसेच, शक्यतो १०+२ स्तरावरील परीक्षेत किंवा पदवी स्तरावरील परिक्षेत गणित विषय दिलेला असावाः

(दोन) अधिनियमान्वये निश्चित केल्याप्रमाणे, समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेला अन्य कोणताही निकष;

(ख) थेट द्वितीय वर्ष (अनुषंगिक) प्रवेश,-

महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार व अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार,-

(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे;

(दोन) सीएसई/आयटी विद्या शाखेतील तंत्रज्ञान पदवी (बी.टेक.)/ अभियांत्रिकी पदवी (बी.ई.) उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात, त्याने एकूण किमान ५० टक्के गुण (केवळ महाराष्ट्र राज्यातील आहेत अशा राखीव प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या व दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४५ टक्के गुण) मिळविलेले असावेत;

(तीन) अधिनियमान्वये निश्चित केल्याप्रमाणे, समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेले अन्य कोणतेही निकष."

(ख) पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ३ येथील नोंदीतील, स्तंभ (३) मधील, खंड (१) मध्ये,-

(एक) उप-खंड (चार) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईलः-

"किंवा

(चार) उमेदवाराला, ज्या विद्याशाखेसाठी प्रवेश मागण्यात येत असेल त्या विद्याशाखेशी संबंधित क्षेत्रातील, कोणत्याही नोंदणीकृत संस्थेतील/ कंपनीतील/ उद्योगधंदयातील/ शैक्षणिक आणि/किंवा संशोधन संस्थेतील किंवा शासनाच्या विभागातील किंवा शासनाच्या स्वायत्त संस्थेतील किमान दोन वर्षांचा पूर्ण वेळ कामाचा अनुभव असला

पाहिजे; (हे उमेदवार केवळ, संस्था स्तरावरील प्रवेशासाठी पात्र असतील);";

(दोन) उप-खंड (पाच) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईलः-

"(पाच) पदवीधर अभियांत्रिकी अभियोग्यता चाचणी (GATE) किंवा पदवीधर औषधनिर्माणशास्त्र अभियोग्यता चाचणी (GPAT) अर्हताप्राप्त (क्वॉलीफाईड) उमेदवारांना, पदवीधर अभियांत्रिकी अभियोग्यता चाचणी (GATE) किंवा पदवीधर औषधनिर्माणशास्त्र अभियोग्यता चाचणी (GPAT) बिगर अर्हताप्राप्त (नॉन क्वॉलीफाईड) उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल. त्यानंतर पदवीधर अभियांत्रिकी अभियोग्यता चाचणी (GATE) किंवा पदवीधर औषधनिर्माणशास्त्र अभियोग्यता चाचणी (GPAT) न दिलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतिश तिडके,**
शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 21st June, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No.ARP-2023/C.R.48/TE-4.—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No.TEM-2020/C.R.71/TE-4, dated the 8th October 2020 (hereinafter referred to as "the said notification"), issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015, hereinafter refered to as "the said Act"), notified the Professional Education Under Graduate Courses and Professional Education Post Graduate Courses specified herein to be the Professional Education for the purposes of the said Act, and the eligibility conditions and requirements for admissions thereto;

And whereas, in view of the modifications in the eligibility for admission to certain under graduate and postgraduate technical education courses by the All India Council for Technical Education *vide* its Approval Process Handbook 2023-24, it is expedient to amend eligibility conditions specified in the said notification for such courses;

And whereas, in order to specify eligibility conditions as per the minimum standards of under graduate Architectural education courses specified by the Council of Architecture *vide* the Council of Architecture (Minimum Standards of Architectural Education) Regulations, 2020, it is expedient to amend the eligibility conditions specified in the said notification for such courses;

And whereas, the Pharmacy Council of India has given approval to certain pharmacy institutions in the State to commence the Bachelor of Pharmacy (Practice) Course with effect from the academic year 2023-24, and the Government considers it expedient to notify the Bachelor of Pharmacy (Practice) Course as the professional education under clause (*r*) of section 2 of the said Act and to specify eligibility conditions and requirements for admissions to the said course as per the Bachelor of Pharmacy (Practice) Regulations, 2014;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the said Act the Government of Maharashtra hereby amends the said notification, for the aforesaid purposes, as follows, namely:—

In the said Notification,—

(*1*) in Schedule A appended to the said notification,—

(*a*) in entry at Serial No.1 relating to Under Graduate Course in Engineering and Technology, in column (3),—

(*i*) in entry (A) relating to First Year Admission,

(I) in clause (*1*), after sub-clause (*ii*) the following sub-clause shall be added, namely:—

"or

(*ii*) Passed three years D.Voc. Stream in the same or allied sector;";

(II) in clause (*2*), after sub-clause (*ii*) the following sub-clause shall be added, namely:—

" or

(*ii*) Passed three years D.Voc. Stream in the same or allied sector;";

(*ii*) in entry (B) relating to Direct Second Year Lateral Entry Admission,— in clause (*ii*), for the words "Passed D.Voc.", the words "Passed three years D.Voc." shall be substituted;

(*b*) in entry at Serial No.3 relating to Under Graduate Course in Architecture, in column (3),—

(*i*) in clause (*1*), for sub-clause (*ii*) the following sub-clause shall be substituted, namely:—

"(*ii*) The candidate should have passed an examination at the end of the 10+2 scheme of examination with at least 50 % (at least 45% for candidates from Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability candidates belonging to Maharashtra State only) aggregate marks in Physics, Chemistry and Mathematics and also at least 50 % (at least 45% for candidates from Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability candidates belonging to Maharashtra State only) marks in aggregate of the 10+2 level examination;

or

(*ii*) The candidate should have passed 10+3 Diploma Examination with Mathematics as compulsory subject with at least 50 % marks (at least 45% for candidates from Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability candidates belonging to Maharashtra State only) in aggregate;";

(*ii*) in clause (*2*), for sub-clause (*i*) the following sub-clause shall be substituted, namely:—

"(*i*) The candidate should have passed an examination at the end of the 10+2 scheme of examination with at least 50% aggregate marks in Physics, Chemistry and Mathematics and also at least 50% marks in aggregate of the 10+2 level examination;

or

(*i*) The candidate should have passed 10+3 Diploma Examination with Mathematics as compulsory subject with at least 50 % marks in aggregate;".

(*c*) in entry at serial No.4 relating to Under Graduate Course in Planning, in column (3),—

(*i*) in clause (*1*),

(I) for sub-clause (*ii*) the following sub-clause shall be substituted, namely:—

"(*ii*) The candidate should have passed 10+2 examination with Mathematics as compulsory subject along with any two subjects out of Physics or Chemistry or Computer Science or Electronics or Information Technology or Biology or Informatics Practices or Biotechnology or Technical Vocational subject or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Entrepreneurship and obtained at least 45 % marks in aggregate (at least 40% marks in aggregate in case of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to Maharashtra State) and the candidate should have obtained non zero score in the MAH- B.Planning-CET conducted by the Competent Authority;

or

(*ii*) The candidate should have passed 10+2 examination with Mathematics as compulsory subject along with any two subjects out of Physics or Chemistry or Computer

Science or Electronics or Information Technology or Biology or Informatics Practices or Biotechnology or Technical Vocational subject or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Entrepreneurship and obtained at least 45 % marks in aggregate (at least 40% marks in aggregate in case of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to Maharashtra State). These candidates shall be eligbile for admission at institute level only:

Provided that, preference shall be given to the candidates appeared for CET conducted by the Competant Authority;

or

(*ii*) Passed D. Voc. Stream in the same or allied sector.";

(II) the sub-clause (*iii*) shall be deleted;

(*ii*) in clause (*2*),

(I) for sub-clause (*ii*), the following sub-clause shall be substituted, namely:—

"(*ii*) The candidate should have passed 10+2 examination with Mathematics as compulsory subject along with any two subjects out of Physics or Chemistry or Computer Science or Electronics or Information Technology or Biology or Informatics Practices or Biotechnology or Technical Vocational subject or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Entrepreneurship and obtained at least 45% marks in aggregate (at least 40% marks in aggregate in case of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to Maharashtra State) and the candidate should have obtained non zero positive score in JEE (Main) B.Planning or the candidate should have obtained non zero score in CET conducted by the Competent Authority:

Provided that, preference shall be given to the candidates obtaining non zero positive score in JEE(Main) B.Planning over the candidates who have obtained non zero score in CET;

or

(*ii*) The candidate should have passed 10+2 examination with Mathematics as compulsory subject along with any two subjects out of Physics or Chemistry or Computer Science or Electronics or Information Technology or Biology or Informatics Practices or Biotechnology or Technical Vocational subject or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Entrepreneurship and obtained at least 45% marks in aggregate (at least 40% marks in aggregate in case of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to Maharashtra State). These candidates shall be eligible for admission at institute level only:

Provided that, preference shall be given to the candidates appeared for JEE (Main) B. Planning or CET conducted by the Competent Authority;"

or

(*ii*) Passed D. Voc. Stream in the same or allied sector;";

(II) sub-clause (*iii*) shall be deleted.

(*d*) in entry at Serial No.5 relating to Under Graduate Course in Hotel Management and Catering Technology, in column (3),—

(*i*) in entry (A) relating to First Year Admission,—

(I) In clause (*1*),

(A) for sub-clause (*ii*), the following sub-clauses shall be substituted, namely:—

"(*ii*) Passed HSC or its equivalent examination and obtained at least 45% marks in aggregate (at least 40% marks in aggregate for Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disabilities candidates belonging to Maharashtra State only) and obtained Non Zero score CET;

or

(*ii*) Passed D. Voc. Stream in the same or allied sector";

(B) sub-clause (*iii*) shall be deleted;

(II) in clause (*2*),

(A) for sub-clause (*ii*) the following sub-clauses shall be substituted, namely:—

"(*ii*) Passed HSC or its equivalent examination and obtained at least 45% marks in aggregate (at least 40% marks in aggregate for Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disabilities category candidates belonging to Maharashtra State) and Obtained non zero positive score in NCHM JEE conducted by National Testing Agency for National Council for Hotel Management and Catering Technology or obtained non-zero score in CET conducted by the Competent Authority:

Provided that, preference shall be given to the candidate obtaining non zero positive score in NCHM JEE over the candidates who obtained non zero score in CET;

or

(*ii*) Passed D. Voc. Stream in the same or allied sector";

(B) sub-clause (*iii*) shall be deleted.

(E) in entry at Serial No.8 relating to Under Graduate Course in Design, in column (3),—

(*i*) in entry (A) relating to First Year Admission, in clause (*1*), for sub-clause (*ii*) the following sub-clauses shall be substituted, namely:—

"(*ii*) The candidate should have passed 10+2 examination and obtained at least 45% marks in aggregate (Aggregate 40% marks in case of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to Maharashtra State) and obtained non-zero score in CET conducted by the Competent Authority;

or

(*ii*) Passed D.Voc. Stream in the same or allied sector.";

(*f*) after entry at Serial No.8, the following entry shall be added, namely:—

"9. Under Graduate Course in Pharmacy [Bachelor of Pharmacy B. Pharm (Practice)]

Maharashtra State Candidature Candidates and All India Candidature Candidates

(*i*) The Candidate should be an Indian National;

(*ii*) Passed Diploma course in Pharmacy from an institution approved by the Pharmacy Council of India under section 12 of the Pharmacy Act, 1948 (8 of 1948);

(*iii*) A registered pharmacist;

(*iv*) A minimum of four years of pharmacy practice experience in a community or hospital pharmacy;

(*v*) 'No Objection Certificate' from the employer;

(*vi*) Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act.".

2. In Schedule B, appended to the said notification-

(*a*) for entry at serial No. 2, relating to Post Graduate Course in Computer Applications [Master of Computer Application (MCA)], the following entry shall be substituted, namely:—

"2. Post Graduate Course in Computer Applications [Master of Computer Application (MCA)]

(A) First Year Admission.-

(1) *For Maharashtra State Candidature Candidates, All India Candidature Candidates, Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh, Migrant Candidature Candidates.* -

(*i*) The candidate should be an Indian National;

(*ii*) Passed any graduation degree (e.g.: B.E. / B.Tech./ B.Sc / B.Com. / B.A./ B. Voc./ BCA etc.,) preferably with Mathematics at 10+2 level or at Graduation level and obtained at least 50% marks (at least 45% in case of candidates of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to Maharashtra State) in the qualifying examination;

(*iii*) The candidate should have obtained non zero positive score in CET.

(2) *NRI / OCI / PIO, Children of Indian workers in the Gulf countries and Foreign National Candidature Candidates.* -

(*i*) Passed any graduation degree (e.g.: B.E. / B.Tech./ B.Sc/ B.Com./ B.A./ B. Voc./ BCA etc.,) preferably with Mathematics at 10+2 level or at Graduation level and obtained at least 50% in the qualifying examination;

(*ii*) Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act;

(B) Second Year (Lateral Entry) Admission.-

Maharashtra State Candidature Candidates and All India Candidature Candidates.-

(*i*) The Candidate should be an Indian National;

(*ii*) Passed B.Tech / B.E. ( CSE/IT) and obtained at least 50% marks in aggregate (at least 45% in case of candidates of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to Maharashtra State);

(*iii*) Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act."

(*b*) in entry at serial No.3 relating to Post Graduate Course in Engineering and Technology, in column (3), in clause (*1*),—

(*i*) after sub-clause (*iv*), the following sub-clauses shall be added, namely:—

" or

(*iv*) candidate should have minimum of two years of full time work experience in a registered firm/ company/ industry/ educational and/ or research institute/ any

Government Department or Government Autonomous Organization in the relevant field in which admission is being sought; (These candidates shall be eligible for admission at institute level only );";

(*ii*) for sub-clause (*v*) the following sub-clause shall be substituted, namely:—

"(*v*) GATE or GPAT Qualified Candidates shall have preference over the GATE or GPAT not Qualified Candidates. Thereafter preference will be given to the candidates not appeared for GATE or GPAT.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TIDKE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.